नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/१०/२०२४ (बुधवार)

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान :— पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत दि.०८/१०/२४ रोजी रात्री ०१/०० वाजे चे कन्हान पोलीस रात्रगस्त करत असतांना हायवा ट्रक क्रमांक एम.एच ४० सी.टी ९८०८ हे मिळुन आले त्यामुळे वाहन थांबवुन पोलीसांनी वाहन चालक आरोपी क्र १) निजाम नासीर खान वय ४० वर्षे ,रा उंटखाना ,कंन्टोन्मेंट एरिया कामठी नागपुर आणि २) हेल्पर नामे विष्णु गेंदालाल गौर ,वय ४८ वर्षे,रा खालसे लाईन कामठी यांना विचारपुस केली असाता त्यांनी सांगितले की ट्रक मालक नामे ३) पवन राकेश यादव रा टेलीफोन एक्सचेंज चौक, नागपुर यांच्या सांगण्यावरून रेती भरून नेत आहोत.रेतीच्या रॉयल्टी बाबत विचारपुस केली असता रॉयल्टी नसल्याबाबत सांगितले. वाहनाची तपासणी केली असता त्यात १० ब्रास रेती मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी क्र १ आणि २ यांच्या ताब्यातुन **१)** हायवा ट्रक क्रमांक एम.एच ४० सी.टी ९८०८ **मुल्य ४०,००,००० /— रूपये २) अंदाजे १० ब्रास रेती मुल्य ७०,०००/— ३) एक ॲन्ड्राईड मोबाईल १०,०००/— रू असा एकुण ४०,८०,००० /— रूपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.**

**पोउपनि एकनाथ पांडुरंग राठोड ,पोस्टे कन्हान** रिपोर्ट वरून **आरोपी क्र. १) निजाम नासीर खान वय ४० वर्षे ,रा उंटखाना ,कंन्टोन्मेंट एरिया कामठी नागपुर (चालक) आणि २) हेल्पर नामे विष्णु गेंदालाल गौर ,वय ४८ वर्षे,रा खालसे लाईन कामठी यांना विचारपुस केली असाता त्यांनी सांगितले की ट्रक मालक नामे ३) पवन राकेश यादव रा टेलीफोन एक्सचेंज चौक, नागपुर** यांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२), ४९ ,३ (५) भा.न्या.सं ४८, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सह कलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्री. संतोष

गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग ,पोलीस स्टेशन कन्हान चे ठाणेदार वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि एकनाथ पांडुरंग राठोड ,पोलीस अंमलदार रवि मिश्रा, चालक पोलीस अंमलदार अशिष बोरकर यांनी पार पाडली.

## खुन करणा—या आरोपीवर गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन नरखेड :— ०१/१०/२४ चे २१/०० वा.ते २१/३० वा दरम्यान मोहदी दळवी ता. नरखेड येथे सिंदूबाई हरीचंद सलामे वय ६० वर्ष रा. मोहदी दळवी ता. नरखेड यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादीचा मुलगा यातील मृतक नामे **संजय हरीचंद सलामे वय ४० रा मोहदी दळवी ता नरखेड** याला त्याचा साळा आरोपी नामे अंकूश कूडसिंगे वय ३२ वर्ष रा.इसबंरी ता वरुड जि अमरावती याने माझ्या बहीणीला हात कशाला लावला असे म्हणुन डोक्यावर कुऱ्हाडीने वार केला मृतक याला सरकारी दवाखाना नरखेड येथे भरती केले होते.उपचारा दरम्यान मृतकाचा मृत्यु झाला.

**दिनांक ०८/१०/२०२४ रोजी** सिंदूबाई हरीचंद सलामे वय ६० वर्ष रा. मोहदी दळवी ता. नरखेड यांच्या रिपोर्ट वरून आरोपी नामे अंकूश कूडसिंगे वय ३२ वर्ष रा. इसबंरी ता वरुड जि अमरावती **विरूध्द पोस्टे नरखेड येथे** कलम १०३(१) बी.एन.एस **अन्वये गुन्हा** नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस नरखेड पोलीसांनी आज दिनांक ०९/१०/२०२४ रोजी अटक केले असुन आरोपी पि.सी.आर मध्ये आहे. पुढील तपास नरखेड पोलीस करत आहेत.

## प्राणांतिक अपघात

पो.स्टे. नरखेड :— ०८/१०/२४ रोजी चे १०/०० वा. च्या सुमारास मौजा घोटमुढरी शीवार गजानन कंळबे यांच्या शेताजवळ **यातील मृतक खुशात नीतेश पटले वय १५ रा. घोटमुढरी** हा शाळेत जात असतांना डस्टर गाडी एम एच ३६ एए २३७८ चालक आरोपी नामे आशिक गुमान चौधरी वय २५ वर्ष रा. सातोना ता. मोहाडी याने मृतक याच्या सायकलला मागुन धडक मारून तेथुन पळुन गेला. धडक मारल्यामुळे मृतक खाली रोडवर पडला त्याच वेळेस पिक अप एम एच ३६ झेड ०२०० चा चालक आरोपी नामे दुर्गेशकुमार यशंवत हटवार वय २३ वर्षे रा. लोभी ता. तुमसर जि. भंडारा याने निष्काळजीने पणाने भरधाव वेगाने गाडी चालविल्याने मृतकाच्या डोक्याला मार लागल्याने

त्याला उपचाराकामी सरकारी दवाखाना भंडारा येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषित केले.

फिर्यादी रपेश सदानंद फंदी रा. खात मौदा यांच्या रिपोर्ट वरून पोस्टे अरोली येथे **आरोपी क्र १) एम एच ३६ एए २३७८ डस्टर चालक आरोपी नामे आशिक गुमान चौधरी वय २५ वर्ष रा. सातोना ता. मोहाडी जि. भंडारा** आणि **आरोपी क्र २ ) पिक अप एम एच ३६ झेड ०२०० चा चालक आरोपी नामे दुर्गेशकुमार यशंवत हटवार वय २३ वर्षे रा. लोभी ता. तुमसर जि. भंडारा यांच्या विरूध्द** कलम २८१, १२५(बी),१०६(२) भा.न्या.सं.सहकलम १८४,१३४४,१८७ माटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.आरोपी क्र १ हा फरार असुन आरोपी क्र २ याला अटक करण्यात अली आहे. पुढील तपास अरोली पोस्टे ठाणेदार सपोनी स्नेहल राउत ९९२२३११०८५ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर